* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

वाशिम दि.११.०७.२०१९

## प्रेस नोट

वाशिम जिल्हा पोलीस दलाचे वतीने तसचे पोलीस अधीक्षक श्री. वसंत परदेशी यांचे संकल्पनेतुन, नैपुण्यप्राप्त प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस भरतीचा सराव करणा–या तरूण/तरूणीकरीता पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्याचे योजिले आहे.

सदर प्रशिणामध्ये शारिरीक व लेखी परिक्षा यामध्ये येणारे विषय याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल तसेच शारिरीक चाचणीसाठी आवश्यक पात्रता यासाठी सराव घेण्यात येईल. सर्व जातीचे–धर्माचे उमेदवारांसाठी सदरचे प्रशिक्षण असुन इयत्ता १२ वी. उतीर्ण व सुदृढ शारिरीक क्षमता असलेल्या व पोलीस भरतीचा सराव करणा–या इच्छुक उमेदवारांनी आपली नावे व मोबाईल कमांक आपले हददीतील पोलीस स्टेशन येथे दिनांक १५.०७.२०१९ रोजी पर्यंत नोंदवावे. इच्छुक उमेदवरांकडुन नोंदणीची माहिती प्राप्त झाल्यानंतर आपणांस प्रशिक्षणाची तारीख कळविण्यात येईल.

सदर प्रशिक्षणाकरीता जास्तीतजास्त उमेदवारांनी आपला सहभाग नोंदवावा जेणेकरून अतिशय उत्साहात सदरचे प्रशिक्षण घेण्यात येईल व त्याचा लाभ हा आगामी पोलीस भरतीमध्ये प्रशिक्षणार्थीना अवश्य मिळेल असे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे मा. पोलीस अधीक्षक श्री..वसंत परदेशी सो. यांनी केले आहे.

११/७

( वसंत परदेशी )
पोलीस अधीक्षक, वाशिम